EAU/ICO/2017-18/339
13th March, 2018

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

मसुदा
क्र. /२०१७–१८

# मुंबई विद्यापीठ

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा *शुक्रवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता* **व्यवस्थापन परिषदेचे दालन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, कलिना कॅम्पस, विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई — ४०० ०९८** येथे आयोजित करण्यात आली. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते:—

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. देवानंद शिंदे (कुलगुरू) | — | अध्यक्ष |
| २. | डॉ. विष्णू मगरे (प्र—कुलगुरू) | — | सदस्य |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | — | सदस्य |
| ४. | डॉ. मुरलीधर कु—हाडे | — | सदस्य |
| ५. | डॉ. (श्रीमती) रश्मी ओझा | — | सदस्य |
| ६. | प्रा. डॉ.गौतम गवळी | — | सदस्य |
| ७. | डॉ. दिनेश कांबळे (कुलसचिव) | — | सदस्य सचिव |
| ८. | श्री. विजय तायडे (वित्त व लेखा अधिकारी) | — | निमंत्रित |
| ९. | डॉ. अर्जुन घाटुळे (संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | — | निमंत्रित |

➢ **स्वागत :—**

कुलसचिवांनी स्वत:च्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

➢ **श्रध्दांजली:—**

**डॉ. निलकंठ बनकर**

मुंबई विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागातील डॉ.निलकंठ बनकर, सहायक प्राध्यापक दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी सकाळी दिर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ३८ वर्षाचे होते. त्यांच्या निधनाची बातमी समजताच मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु, प्र—कुलगुरु, कुलसचिव व व्यवस्थापन परिषदेच्या सन्माननीय सदस्यांनी डॉ. बनकर यांच्या पार्थिव देहाचे दर्शन घेतले व त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होवून त्यांना धीर दिला.

मानसशास्त्र विभागातील विभागप्रमुख व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. डॉ. गौतम गवळी यांनी कुलगुरु, प्र—कुलगुरु, व कुलसचिव यांनी प्रत्यक्ष कुटूंबाची भेट घेवून त्यांच्या दु:खात सहभागी झाल्याबद्दल विद्यापीठ प्रशासनाबाबत सद्भावना व्यक्त केल्या.

**श्रीमती सुधा करमरकर**

मराठी बालरंगभूमीच्या जन्मदात्री आणि जेष्ठ अभिनेत्री, दिग्दर्शिका श्रीमती सुधा करमरकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८४ वर्षांच्या होत्या.

**श्रीमती सिंधू विठठ्ल भुस्कुटे**

स्वातंत्र्यसेनानी श्रीमती सिंधू विठठ्ल भुस्कुटे यांचे वृध्दापकाळाने दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१८ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८६ वर्षांच्या होत्या.

**मुझफ्फर हुसेन**

जेष्ठ पत्रकार पद्मश्री मुझफ्फर हुसेन यांचे वृध्दापकाळाने दिनांक १३ फेब्रुवारी, २०१८ रोजी निधन झाले.

निधनाबद्दल शोक व्यक्त करुन सर्व मान्यवरांना दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**बाब क्र.१ दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.**

ठराव — असा ठराव करण्यात आला की, दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले.

**बाब क्र.२ विद्वत परिषदेच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त (बाब क्र. ४.१, ५.१) मान्यतेसाठी सादर.**

ठराव — असा ठराव करण्यात आला की, विद्वत परिषदेच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी संपन्न झालेल्या सभेतील बाब क्र. ४.१, ५.१ वरील ठराव दुरुस्तीसह मंजूर करण्यात आला. (दुरुस्तीत ठराव सोबत जोडला आहे.)

**बाब क्र.३ विद्यापीठातील मागासवर्गीय शिक्षकांच्या तक्रारीचे निवारण करण्याकरीता त्रिसदस्यीय समितीने दिलेला अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

ठराव — डॉ. सुंदर राजदीप, सहायक प्राध्यापक, संज्ञापन व पत्रकारिता विभाग यांनी संजय रानडे, विभाग प्रमुख व डॉ. दैवता पाटील, सहायक प्राध्यापक संज्ञापन व पत्रकारिता विभाग यांचे विरुध्द केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग यांनी क्रमांक मुं/विधी/प्र.क्र. १९८/२०१७/२४६६, दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ अन्वये केलेल्या सुचनेनुसार निवारण करण्याकरिता स्थापन केलेल्या खालील त्रिसदस्यीय समितीचा अहवाल आयोगास दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी सुनावणी

असल्याने सादर करण्यात आला असून त्याबाबतची नोंद घेण्यात आली.

१. प्रा. चौगुले,
२. प्रा. श्याम जोशी,
३. डॉ. संगीता पवार

**बाब क्र.४** **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४ (२)(च) नुसार वित्त व लेखा समितीवर व्यवस्थापन परिषदेने दोन तज्ज्ञ सदस्यांचे (त्यापैकी एक तज्ज्ञ व्यक्ती ही लेखांकन आणि लेखापरिक्षा क्षेत्रातील आणि दुसरी तज्ज्ञ व्यक्ती ही वित्त क्षेत्रातील) नामनिर्देशन करण्याबाबत.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(२)(च) नुसार वित्त व लेखा समितीवर व्यवस्थापन परिषदेने दोन तज्ज्ञ सदस्यांचे (त्यातील एक तज्ज्ञ व्यक्ती लेखांकन आणि लेखापरिक्षा क्षेत्रातील व दुसरी तज्ज्ञ व्यक्ती वित्त क्षेत्रातील) नामनिर्देशन करण्याबाबत कुलगुरुंना अधिकार प्रदान करण्यात आले.

**बाब क्र.५** **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ मधील कलम ७२ (२) नुसार व्यवस्थापन परिषदेने परिनियम समिती गठीत करण्याबाबत.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७२(२) नुसार व्यवस्थापन परिषदेने परिनियम समिती गठीत करण्याबाबत कुलगुरुंना समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले.

**बाब क्र.६** **Extension of autonomous status to Veermata Jijabai Technological Institute from the academic year 2016-17.**

ठराव It was resolved that, the matter regarding extension of autonomous status to Veermata Jijabai Technological Institute from the academic year 2016-17 be referred back to the Academic Council as the UGC nominated member was not nominated on the committee as per statute 597.

**बाब क्र.७** **महाराष्ट्र शासन पत्र कं बीसीसी–२०१७/प्र.क.३१२१/१६–ब, दिनांक २९ डिसेंबर, २०१७ अन्वये पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिका कं.२७९७/२०१५ वर दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नती देण्यासंदर्भात मार्गदशनपर सूचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत.**

ठराव असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र शासन पत्र कं

बीसीसी—२०१७/प्र.क्र.३१२१/१६—ब, दिनांक २९ डिसेंबर, २०१७ अन्वये पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिका क्रं. २७९७/२०१५ वर दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर शासन निर्णय स्विकारुन प्रशासकीय स्तरावर कार्यवाही सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.

**बाब क्र.८ दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजी मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यासाठी येणा—या खर्चासाठी प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

ठराव — असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक बैठक —२४१३/(प्र.क्र.०४/१७)/समन्वय, दिनांक २० जानेवारी, २०१४ नुसार रत्नागिरी येथे मराठी भाषा दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी व त्यासाठी येणा--या खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

**बाब क्र.९ शासन संस्थापित सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांचेकडून नेमलेल्या सुरक्षा रक्षकांच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.**

ठराव — असा ठराव करण्यात आला की, शासन संस्थापित सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांचे मार्फत दिनांक १ डिसेंबर, २०१७ पासून प्रत्येक सुरक्षा रक्षकांसाठी रुपये २१,८४३/— (रुपये एकवीस हजार आठशे त्रेचाळीस फक्त) या मासिक वेतनावर एकंदरीत वेतनावर कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या ३५ सुरक्षा रक्षकांची देयके अदा करण्यात यावीत व सदर मंडळास दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत एकत्रीत वेतनावर सुरक्षा रक्षक ठेवण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच, असाही ठराव करण्यात आला की, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत बाब क्रमांक ३ अन्वये गठीत करण्यात आलेल्या समितीमध्ये डॉ. गौतम गवळी (मानसशास्त्र विभाग) व श्री. नामदेव बुकाने (सुरक्षा अधिकारी) यांचा समावेश करण्यात यावा. सदर समितीवर सुरक्षा क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना प्रदान करण्यात आले.

सदर समितीने अहवाल आठ दिवसात सादर करावा.

**बाब क्र.१० To build a repository of online courses of Internationalized Master Degree Education in Nanoelectronics in Seven Countries.**

ठराव — It was resolved that, the permission to build a repository of online courses of Internationalized Master Degree Education in Nano electronics in Seven Countries be granted.

**बाब क्र.११ नॅशनल सेंटर फॉर नॅनोसायन्सेस अॅन्ड नॅनोटेक्नॉलॉजी येथील शिक्षकांच्या सेवा नियमित करण्याच्या विनंतीबाबत.**

ठराव अस ठराव करण्यात आला की, नॅशनल सेंटर फॉर नॅनोसायन्सेस अॅन्ड नॅनोटेक्नॉलॉजी येथील शिक्षक सर्वश्री डॉ. अतुल चासकर, डॉ. सुहास जेजुरीकर व डॉ. प्रविण वाळके यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असल्याने या शिक्षकांच्या सेवा नियमित करण्याबाबत सखोल अभ्यास करण्यासाठी खालील सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी :—

१. प्राचार्य डॉ. मुरलीधर कु—हाडे
२. डॉ. गौतम गवळी
३. श्रीमती डॉ. शेफाली पंडया
४. डॉ. एम.एम.व्ही.रामणा

समितीने याबाबतचा अहवाल आठ दिवसात सादर करावा.

**अध्यक्षांच्या परवानगीने अन्य विषयांवर चर्चा करताना खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आले.**

अ) डॉ.गौतम गवळी, विभाग प्रमुख, मानसशास्त्र विभाग यांनी Disability Studies Centre विद्यापीठात स्थापन करुन दिव्यांगासाठी उच्च शिक्षणाचे विविध अभ्यासक्रम तयार करण्यात यावे, अशी सूचना केली असता त्यास मान्यता देण्यात आली.

ब) मुंबई विद्यापीठास उत्तुंग समुद्र किना—याची देणगी असल्याने सर्व ज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांची क्षमता वाढविण्यासाठी Capacity Building Centre for Advance Marine Studies विद्यापीठात स्थापन करण्याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करण्यासाठी सदर बाब अधिष्ठाता मंडळाकडे पाठविण्यात यावी.

क) Arising out of discussion on the construction of various buildings it was resolved that the committee consisting of following members be constituted to go through of the status of construction as per PMC/Architect report and to submit a report for making payment to the contractors, within eight days :-

1. Shri Deepakkumar Mukadam (Convener),
2. Dr. Gautam Gawali,
3. Dr. Rashmi Oza,
4. Dr.M.S. Kurhade,
5. Finance & Accounts Officer

ड) श्री. विजय फ.तायडे, वित्त व लेखा अधिकारी हे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजी सेवानिवृत्त होणार असल्याने व दिनांक ३० व ३१ मार्च, २०१८ रोजी अधिसभेच्या बैठकीत २०१८–१९ चा अर्थसंकल्प सादर करण्यात येणार असल्याने श्री. विजय तायडे यांच्या ज्ञानाची व अनुभवाची विद्यापीठास गरज लक्षात घेता शासन निर्णय क्रमांक संकीर्ण – २७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ अन्वये त्यांची विद्यापीठाच्या सेवेत ११ महिन्यांसाठी सल्लागार (वित्त व लेखा) म्हणून नेमणूक करण्यात यावी. त्यांचे वेतन शासनाच्या प्रचलित नियमानुसार निश्चित करण्यात यावे.

इ) वाधवानी इन्स्टिट्युट ऑफ आर्टिफिशीयल इंटेलीजन्स ही संस्था मुंबई विद्यापीठात सुरु करताना मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री यांचे उपस्थितीत व मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी, यांचे हस्ते देशास समर्पित करण्याचा सोहळा रविवार दिनांक १८ फेब्रुवारी, २०१८ रोजी होणार असल्याने यासाठी होणा–या आकस्मिक खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

सभेमध्ये सहभाग घेतल्याबद्दल सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे आभार व्यक्त करून अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे कुलसचिवांनी घोषित केले.

SKSawant 13/03/18

सहायक कुलसचिव

१३/३/१८

कुलसचिव

प्र-कुलगुरू १५/३/१८

14/3/18

कुलगुरू